# पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील कॉलेजमध्ये राष्ट्रीय परिषद उत्साहात संपन्न

## आर्किटेक्चर क्षेत्रातील नवतंत्रज्ञानावर राष्ट्रीय स्तरावरील मंथन




**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्चर येथे 'इनोव्हेशन इन आर्किटेक्चर, टेक्नॉलॉजी अँड अलाइड फील्ड्स' या विषयावर दोन दिवसीय राष्ट्रीय परिषद १३ व १४ फेब्रुवारी २०२६ रोजी मोठ्या उत्साहात पार पडली. देशभरातील वास्तुविशारद, संशोधक आणि विद्यार्थ्यांचा या परिषदेत मोठ्या संख्येने सहभाग नोंदविण्यात आला.**

परिषदेचे उद्घाटन नामवंत संरक्षक (CONSERVATIONIST) डॉ. बेनी कुरीकोस तसेच COUNCIL OF ARCHITECTURE, नवी दिल्लीचे अध्यक्ष आर्किटेक्ट अभय पुरोहित यांच्या हस्ते झाले. उद्घाटनप्रसंगी डॉ. बेनी कुरीकोस यांनी ऐतिहासिक वारसा जतन करताना आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर कसा करावा याबाबत मार्गदर्शन केले. आर्किटेक्ट अभय पुरोहित यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना व्यावसायिक नीतिमत्ता, बदलते जागतिकीकरण आणि वास्तुविशारदांनी काळानुरूप स्वतःला सुसंगत ठेवण्याचे महत्त्व अधोरेखित केले.

राष्ट्रीय परिषदेच्या बक्षीस समारंभासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. प्रभाकर देसाई प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या कार्यक्रमास संस्थेचे संचालक श्री तेजस सतेज पाटील, कार्यकारी संचालक ऍडमिरल अमित विक्रम (निवृत्त) आणि मुख्य वित्त अधिकारी श्री बिपीन शर्मा उपस्थित होते. त्यांनी संस्थेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे विशेष कौतुक केले.

परिषदेच्या दोन दिवसांत विविध अभ्यासपूर्ण तांत्रिक सत्रांचे आयोजन करण्यात आले. पर्यावरणपूरक डिझाइन, आर्किटेक्चर क्षेत्रातील आधुनिक एआयचा वापर, शाश्वत विकास आणि नवतंत्रज्ञान यांसारख्या विषयांवर सखोल चर्चा झाली. देशभरातील शिक्षक व विद्यार्थ्यांनी आपले संशोधन निबंध सादर केले. त्यातील उत्कृष्ट संशोधन कार्याचा गौरव करण्यात आला. परिषदेला उपस्थित नामवंत वास्तुविशारदांनी त्यांच्या प्रकल्पांतील अनुभवांचे सादरीकरण केले, ज्यामुळे विद्यार्थ्यांना व्यवहारज्ञानाची मोलाची शिदोरी मिळाली.

परिषदेच्या तांत्रिक सत्रांचे समन्वयन संयोजक व प्रभारी प्राचार्या आर्किटेक्ट छाया तिरवीर यांनी यशस्वीपणे पार पाडले. देशभरातून आलेल्या पाहुण्यांनी आयोजन आणि नियोजनाचे विशेष कौतुक केले.

या भव्य परिषदेचे नियोजन महाविद्यालयाचे संयोजक व प्राचार्य डॉ. धनंजय चौधरी तसेच संयोजक व प्रभारी प्राचार्या आर्किटेक्ट छाया तिरवीर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. त्यांच्या नेतृत्वाखाली परिषदेने शैक्षणिक व तांत्रिक स्तरावर उच्चांक प्रस्थापित केला. संशोधक वृत्ती जोपासण्याचे महत्त्व अधोरेखित करत ही परिषद आर्किटेक्चर क्षेत्रासाठी मार्गदर्शक ठरली.

# 'पीसीसीओईआर'ला विद्यापीठाचा सर्वोत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**एज्युकेशन ट्रस्टच्या पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजीनियरिंग अँड रिसर्च (पीसीसीओईआर) महाविद्यालयाला सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे सर्वोत्कृष्ट महाविद्यालय या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या वर्धापन दिनाच्या सोहळ्यात विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्र – कुलगुरु डॉ. पराग काळकर यांच्या हस्ते उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर यांनी महाविद्यालयाच्या वतीने पुरस्कार स्वीकारला. दीड लाख रुपये, स्मृतिचिन्ह आणि प्रमाणपत्र असे पुरस्काराचे स्वरूप होते.**




पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट संचलित पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड रिसर्च (पीसीसीओईआर) या महाविद्यालयाला सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ तर्फे 'सर्वोत्कृष्ट महाविद्यालय' या प्रतिष्ठेच्या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. विद्यापीठाच्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित भव्य सोहळ्यात विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी तसेच प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. महाविद्यालयाच्या वतीने उद्योजक नरेंद्र लांडगे आणि अजिंक्य काळभोर यांनी पुरस्कार स्वीकारला. या पुरस्कारामध्ये दीड लाख रुपये रोख पारितोषिक, स्मृतिचिन्ह आणि मानपत्राचा समावेश होता.

या गौरवप्रसंगी पीसीसीओईआरचे संचालक डॉ. हरीश तिवारी, उपसंचालक डॉ. राहुल मापारी, रजिस्ट्रार प्रकाश येवले यांच्यासह प्राध्यापक व कर्मचारी वर्ग उपस्थित होता. या यशामुळे महाविद्यालयाच्या शैक्षणिक, संशोधनात्मक आणि प्रशासकीय कार्यक्षमतेला विद्यापीठ पातळीवर मान्यता मिळाल्याचे अधोरेखित झाले.

सन २०१४ मध्ये स्थापन झालेल्या पीसीसीओईआरने अल्पावधीतच गुणवत्ता, संशोधन आणि नवोपक्रमाच्या क्षेत्रात उल्लेखनीय प्रगती साधली आहे. महाविद्यालयाला यापूर्वी राष्ट्रीय मूल्यांकन व मानांकन परिषदेचे (NAAC) 'ए प्लस प्लस' मानांकन प्राप्त झाले असून चार विभागांना राष्ट्रीय मानांकन मंडळाचे (NBA) मानांकन मिळाले आहे. तसेच अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेची (AICTE) मान्यता आणि शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून स्वायत्ततेचा दर्जाही महाविद्यालयाला बहाल करण्यात आला आहे.

सध्या महाविद्यालयात ३००० हून अधिक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. संशोधनक्षम वातावरणाची जपणूक करताना ४४ पीएच.डी. धारक प्राध्यापक कार्यरत असून ५५ प्राध्यापक पीएच.डी. अभ्यासक्रम पूर्ण करत आहेत. संशोधन आणि बौद्धिक संपदा हक्कांच्या क्षेत्रातही पीसीसीओईआरने उल्लेखनीय कामगिरी केली आहे. आतापर्यंत ४१९ पेटंट अर्ज दाखल करण्यात आले असून त्यापैकी २८५ प्रकाशित, ५० मंजूर आणि ३ पेटंटचे व्यावसायीकरण करण्यात आले आहे. कॉपीराइट व पेटंट क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल 'वर्ल्ड रेकॉर्ड ऑफ इंडिया'कडून दोन वेळा प्रमाणपत्र देऊन महाविद्यालयाचा गौरव करण्यात आला आहे.

या यशाबद्दल ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर तसेच कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी सर्व प्राध्यापक, अधिकारी व कर्मचारी वर्गाचे मनःपूर्वक अभिनंदन केले. त्यांनी भविष्यातही उत्कृष्ट शैक्षणिक परंपरा आणि संशोधनाचा दर्जा अधिक उंचावण्यासाठी सर्वांनी एकजुटीने कार्य करण्याचे आवाहन केले.